पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/०३-०४
पुणे. दिनांक : १६/५/२००३

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
कांतीलाल खिवसरा इंग्लिश मिडीयम स्कूल,
लक्ष्मणनगर, थेरगाव, पुणे-३३.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००२-०३ – इ.९ वी. २००३-०४ – इ.१० वी.
===== इ.९ वी, इ.१० वी.

आपल्या – भारतीय ज्ञानवर्धिनी सभा, चिंचवड, पुणे. या शैक्षणिक संस्थेव्दारा संचालित – कांतीलाल खिवसरा इं.मि.स्कूल, लक्ष्मणनगर, थेरगाव, पुणे माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/इ. वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००१ –०२ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुणे/२३५३०/३९, दि. २२/७/०३ अन्वये शासनाची प्रथम मान्यता मिळालेली आहे. सन २००२ –२००३ सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत अनुक्रमे इ.९ वी, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००३ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गांची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी.चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण माध्यमिक विभाग,
जा. क्र. शिक्षण / माध्य./ह. समाव/२००५
पुणे -१. दि. २९.११.२००५

प्रति,
मुख्याध्यापक,
कांतीलाल एम खिंवसरा इंग्रजी (माध्यम),
माध्यमिक विदयालय लक्ष्मणनगर,
थेरगांव , पुणे ३३

विषय :- इंग्रजी माध्यमिक शाळेस हिंदी माध्यमाचे इ. ८ वी, ९वी ,१०वी वर्गास समांतर वर्ग म्हणून मान्यता मिळणेबाबत

संदर्भ :- १. आपले पत्र क्र. के / ई/एम/८२/०५ दि. १०.९.२००५
२. शासन पत्र क्र. समाव १००५/(८५४/०५) माशि -१/ दि. १०.११.२००५
३. मा. शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग पुणे -१, यांचे पत्र क्र. माध्य. ३/१३/२४०२५ - २७ / पुवि / दि. १४.११.२००५

उपरोक्त विषय आणि संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की संदर्भ क्र. १ अन्वये आपण या कार्यालयास सादर केलेला उपरोक्त विषयाचा प्रस्ताव शिफारस करून मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे -१ यांचे मार्फत शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता.

आता वरील संदर्भ क्र. २ आणि ३ अन्वये सदरच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आले असल्याचे या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. सदरच्या संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की कांतीलाल एम खिंवसरा थेरगांव पुणे या इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेस विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेवून इ.८ वी, ९वी, १० वी च्या हिंदी माध्यमाच्या समांतर वर्गास खालील अटींच्या अधिन राहून कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली आहे.

क्र.मा.प.

१. संबधित संस्था उक्त समांतर वर्गाच्या संदर्भात निर्धारित शैक्षणिक व भौतिक सुविधा पुरविल.

२. समांतर वर्गावर विहित अर्हता प्राप्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती संस्थेकडून करण्यात येईल.

३. या पुढे संस्था कोणतीही नियमबाहय कृती करणार नाही केल्यास संस्थेविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

४. उक्त समांतर वर्ग कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याचे १०० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर संस्था हमीपत्र देईल.

५. वेळोवेळी निर्गमित होणा-या शासन आदेशाचा संस्था काटेकोरपणे पालन करील.

याबाबत वरील अटींच्या अधीन राहून नियमानुसार कार्यवाही करावी.

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रत :-

१. मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१

२. मा. विभागीय सचिव,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभाग, पुणे -५

यांना माहितीस्तव सविनय सादर

२३५३६-३९

परवानगी वर्ष : २००१ - २००२
माध्यम : इंग्रजी
: कायम विना अनुदान

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२००२-३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 22 SEP 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

विषय : प्रथम मान्यता. . .
कांतीलाल खिंवसरा इंग्लिश मिडीयम स्कूल, लक्ष्मणनगर थेरगांव, पुणे-३३

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक शिक्षण/माध्य/ह-४/प्र. मा. /६८६/०३, दि. २. ९. २००३

२. शा.प.क्र. नमाशा- १००३/[३७३]२००३/माशि-१, दि. २७. ६. २००३

३. कार्यालयाचे पत्र क्र. माध्य. ३[१४]नमाशा/मान्यता/पुवि/२००३ दि. १५. ९. २००३

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये भारतीय ज्ञानवर्धिनी सभा, चिंचवड, जि. पुणे संस्थेच्या कांतीलाल खिंवसरा इंग्लिश मिडीयम स्कूल, लक्ष्मणनगर, थेरगांव पुणे माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००१-२००२ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००१ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

कायम विना अनुदान

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता